## अलिप्ततावाद

अलिप्ततावाद हा शब्द सर्वप्रथम पं.नेहरूंनी 1954 मध्ये कोलंबोतील एक भाषणात केला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहावे. म्हणून अलिप्ततावाद होय. पं नेहरूंच्या मते कोणत्याही अष्ट्री राष्ट्राचे अंकित म्हणून राहता आम्ही स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये भाग घेऊ. आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून दूर राहू इच्छितो. USA, USSR या महासत्ताच्या गटामध्ये सामिल न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळवता येईल असे नेहरूंचे मत होते म्हणून नेहरूंनी अलिप्तवादाचे उद्धारकरते म्हणतात. नेहरूंना पाठिंबा देण्यासाठी आशिया व आफ्रिका खंडातील देश सहभागी झाले. उदा: भारत, श्रीलंका, इजिप्त घाना, युगोस्लाव्हिया, अफ्रिकेतील देश.

## अलिप्ततावादाचे कारणे

1) राष्ट्री राष्ट्रहितास प्राधान्य देण्यासाठी
2) जागतिक शांतता व सहकार्य वाढविण्यासाठी
3) अफ्रो - आशियाई राष्ट्रांना सहकार्य व्हावे म्हणून
4) वसाहत वादाला विरोध करण्यासाठी वसाहतवादाला विरोध
5) संयुक्त राष्ट्राला सहकार्य करणे.

## अलिप्ततावादाची वैशिष्ट्ये

1) लष्करी संघटना व लष्करी करारापासून मुक्तता
2) शांततेच्या धोरणाचा अवलंब
3) सहकार्य व सहजीवनाचे धोरण
4) स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचा अंगिकार
5) निश्शस्त्रीकरणाचे धोरण

6) प्रसंगानुरूप कार्यवाही करण्याचे स्वातंत्र्य

वरील वैशिष्ट्यांचा अलिप्त राष्ट्राच्या चळवळीची वाटचाल सुरू झाली भारताचे PM पं.नेहरू इजिप्तचे अध्यक्ष अब्दुल गमाल नासेर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांच्या नेतृत्वाखाली अलिप्तराष्ट्र संघटन निर्माण झाली.

पंचशीलतत्वे

जैन व बौद्ध धर्मामध्ये या तत्वाला विशेष महत्त्व आहे. सत्य, अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय, ब्रम्हचर्य या पंचशील मार्गाने शीलसंवर्धनावर भर देण्यात आला आशिया खंडामधील अनेक राष्ट्रावर बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याने पाश्चात्याच्या गुलामगिरीतून इंडोनेशियाला मुक्त करण्यासाठी घेण्यात आलेल्या स्वातंत्र्य सैनिकाच्या मेळाव्यात डॉ सुकार्नो यांनी बौद्ध धर्मीय पंचशील तत्वाचे स्वीकार करण्याचे आव्हान सर्वांना केले. यामध्ये त्यांना राष्ट्रभक्ती, श्रद्धा, व्यक्ती, स्वातंत्र्य, सामाजिक व देवावर विश्वास या तात्वाची त्यांनी घोषणा केली.

पं नेहरूनी पंचशील तत्वाचे पावित्र्य ओळखून त्यास देशाच्या अलिप्ततावादाच्या धोरणात स्थान देण्याचे ठरवले. 29 April 1954 मध्ये तिबेटच्या स्वायत्त संबंधी भारत व चीन यांच्यात झालेल्या करारामध्ये आधुनिक पंचशील तत्वाचा समावेश करण्यात आला ती तत्वे खालीलप्रमाणे.

1) कोणत्याही कारणास्तव परराष्ट्रावर आक्रमण न करणे.
2) एकमेकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे
3) ~~परस~~ परस्परांना हितवाह होऊन अशा समानतेचा व्यवहार करणे
4) शांततामय सहजीवनाचा अंगीकार करणे.
5) परस्परांना सार्वभौमत्वाचा व प्रादेशिक एकात्मतेचा आदर करणे.

भारताने अंगीकारलेल्या पंचशील धोरणास व्हिएतनाम म्यानमार, नेपाळ, लाओस, युगोस्लाव्हिया, कंबोडिया इ. राष्ट्रांनी मान्यता दिली इंडोनेशियातील बांडुंग येथे नव स्वतंत्र आशिया व आफ्रिका राष्ट्रांची परिषद 18 April 1955 मध्ये संपन्न झाली. आशियातील 23 देश तर आफ्रिकातील 6 राष्ट्रांनी सहभाग घेतला होता. या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधावर विचार विनिमय झाला. नेहरूंनी पंचशील धोरणाला अंगीकार करण्याचे आव्हान सर्वांनी केले. पाकिस्तान वगळता परिषदेतील सर्व राष्ट्रांनी मान्यता दिली.

1961 बेलग्रेड (सर्बियाची राजधानी) पहिली परिषद अलिप्तराष्ट्रांची पहिली अधिकृत परिषद येथे भरली जागतिक शांतता व निशस्त्रीकरणाची आव्हाने स्वीकारले

इंदिरा गांधींच्या काळातील अलिप्ततावाद

Sept 1970 मध्ये लुसाका येथे ही परिषद भरली एकूण 54 देशांनी त्यात सहभाग नोंदवला सक्रिय व शांततामय वातावरणावर आधारित आंतरराष्ट्रीय संबंधावर चर्चा करण्यात आली तसेच हिंदी महासागर अणुशक्ती विहीन परिषद म्हणून घोषित करण्याची मागणी.

चौथी परिषद - 1973 आलजियर्स (अल्जेरिया) NAM च्या देशांनी त्यात UNO मध्ये स्थान देणे त्यासाठी UNO ची पुनर्रचना करणे गरजेचे आहे.

पाचवी परिषद 1976 कोलंबो 7वी परिषद 1983 दिल्ली (इंदिरा गांधी)

सहावी परिषद 1979 हवाना [99 देशांचे प्रतिनिधी

इराण, इराक युद्धबंदीचे आव्हान इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादाचे ठामपणे प्रतिपादित केले.